# C1D/AGR104/EE/20160304

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) परसबाग म्हणजे काय? ते लिहून परसबागेसाठी आवश्यक निविष्ठा उदाहरणासह लिहा. 5

ब) बाग तयार करण्याच्या उद्देशाप्रमाणे बागेचे प्रकार थोडक्यात स्पष्ट करा. 5

क) हरितगृहाची आवश्यकता लिहून हरितगृहांचे विविध प्रकार लिहा. 5

ड) बागेतील भिंतीच्या आवश्यकतेविषयी माहिती लिहा. 5

इ) हिरवळ तयार करण्याच्या विविध पद्धती लिहून कोणत्याही एका प्रकाराविषयी माहिती लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) बागेतील झुडुपांच्या मुख्य दोन प्रकारांविषयी माहिती लिहा. 5

ब) कुंपणासाठी योग्य असलेल्या कोणत्याही दोन झाडांची सविस्तर माहिती लिहा. 5

क) विविध आकर्षक पानांच्या झुडुपांची नावे लिहून कोणत्याही एका झुडुपांची गुणवैशिष्ट्ये लिहा. 5

ड) घरात ठेवण्यासाठी शोभिवंत झाडांना घरातील परिस्थिती कशी असावी ते लिहा. 5

इ) निवडुंगाच्या कलम करण्याच्या विविध पद्धतींची माहिती लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) लतावेलींचे विविध प्रकार लिहून सावलीत वाढणाऱ्या वेली या प्रकाराविषयी उदाहरणासह माहिती लिहा. 5

ब) कोणत्याही महत्त्वाच्या पाच शोभिवंत झाडांची सविस्तर माहिती लिहा. 5

क) ऑर्किडच्या अभिवृद्धीचे प्रकार लिहून कोणत्याही एका प्रकाराविषयी माहिती लिहा. 5

ड) वामनवृक्षांकरिता रोपांची निवड कशी करावी ते लिहा. 5

इ) लाल कमळ व नील कमळ याविषयी सविस्तर माहिती लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) बागेचा आराखडा तयार करताना कोणत्या बाबींचा विचार करावा ते स्पष्ट करा. 5

ब) रोपवाटिकेतील झाडे विकत घेताना कोणकोणत्या गोष्टी तपासून पाहाव्यात ते सविस्तर लिहा. 5

क) खडक बागेसाठी लागणाऱ्या विविध झाडांचे हंगामानुसार वर्गीकरण करून प्रत्येकी दोन उदाहरणे लिहा. 5

ड) पुष्परचनेची तत्वे थोडक्यात स्पष्ट करा. 5

इ) प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणती तयारी करणे आवश्यक असते याबद्दल सविस्तर माहिती लिहा. 5